इंग्रजीत टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

**[(१९५२) एस. सी. आर. ३९५]**

**नरंजन सिंह नथवन**

**-विरुद्ध-**

**पंजाब राज्य**

**(आणि इतर १३ याचिकाकर्ते).**

१९५२
--------
२५ जानेवारी

**मुख्य न्यायमूर्ति पतंजली शास्त्री, न्यायमूर्ति मेहर चंद महाजन, न्यायमूर्ति मुखर्जी, न्यायमूर्ति दास आणि न्यायमूर्ति चंद्रसेखर अय्यर)**

प्रतिबंधात्मक स्थानबद्धता - स्थानबद्धतेच्या आदेशाला बेकायदेशीर म्हणून आव्हान देण्यात आले - जुना आदेश नवीन आदेशाने निष्प्रभावित - वैधता- असद्भावनेचा प्रश्न - देहोपस्थिती (हेबियस कॉर्पस) ची कार्यवाही - स्थानबद्धतेच्या कायदेशीरतेची निश्चितता परतीच्या तारखेवरून ठरविण्यात यावी.

असद्भावनेच्या अभावी, स्थानबद्ध करणारे अधिकारी अगोदरचा स्थानबद्धतेचा आदेश ज्या विरुद्ध फक्त दोषपूर्ण असल्याच्या कारणावरून आव्हान करण्यात आले आणि नवीन आदेश जेव्हा शक्य असेल आणि जो दोषमुक्त असेल आणि त्याद्वारे योग्यरीत्या कायद्याच्या आवश्यकतेचे पालन करू शकत असेल तर तो जारी करण्यात येऊ शकतो. असद्भावाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला तर सदर प्रश्न प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीच्या संदर्भानुसार निर्णीत केल्या गेला पाहिजे .

देहोपस्थीच्या (हेबियस कॉर्पस) च्या कार्यवाहीमध्ये न्यायालयाने कार्यवाही सुरु होण्याच्या तारखेकडे लक्ष न देता कायदेशीरपणा किंवा अन्यथा स्थानबद्ध करण्याबाबत परतीची वेळ इतर बाबींकडे लक्ष दिले पाहिजे.

जसे [१९५२] एस.सी. आर. ३६८ मध्ये प्रकाशित

*त्यानंतर बसंत चंद्र घोष - विरुद्ध - किंग एम्परर* ([१९४५] *एफ. सी. आर. ८१). नरंजन सिंग - विरुद्ध - द स्टेट ऑफ पंजाब (अप्रकाशित) यांनी स्पष्ट केले. माखन सिंग तारसिक्का - विरुद्ध - पंजाब राज्य* ([१९५२] *एस. सी. आर. ३६८) संदर्भित.*

**फौजदारी न्यायाधीकारिता :- संविधानाच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत देहोपस्थीच्या (हेबियस कॉर्पस) साठी रिट याचिका (५१३, ५६६, ५६८, ५७०, ५९१, ५९५, ५९६, ६०१, ६१६, ६१७, ६२३, ६२५, ६३१ आणि ६३२/१९५१ ).** न्यायनिर्णयात सांगण्यात आलेली तथ्ये -

याचिका क्रमांक ५१३, ५६६, ५६८, ५७०, ५९५, ५९६, ६०९, ६१६, ६१७, ६२३, ६२५ आणि ६३१ मधील याचिकाकर्त्यांसाठी रघबीर सिंग (न्यायमित्र).

याचिका क्रमांक ५९१ मध्ये याचिकाकर्त्यासाठी ए. एस. आर. चारी (न्यायमित्र).

याचिका क्रमांक ६३२ मध्ये याचिकाकर्त्यासाठी शिवचरण सिंग (न्यायमित्र).

पंजाब राज्यासाठी पंजाबचे महाधिवक्ता एस. एम. सिक्री (त्यांच्यासोबत जिंद्र लाल).

२५ जानेवारी १९५२. **न्यायालयाचा न्यायनिर्णय सरन्यायाधीश पतंजली शास्त्री यांच्या द्वारे देण्यात आला** - सदर याचिका ही संविधानाच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह, अंबाला यांच्याद्वारे सादर करण्यात आली असून त्यामध्ये याचिकाकर्त्याची कोठडीतून सुटका करण्यासाठी देहोपस्थीतीची (हेबियस कॉर्पस) रीट जारी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

५ जुलै १९५० रोजी, प्रतिबंधात्मक स्थानबद्धता अधिनियम, १९५० च्या कलम ३ अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अमृतसरच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार याचिकाकर्त्याला स्थानबद्ध करण्यात आले होते आणि ताब्यात घेण्यात आले होते आणि १० जुलै १९५० रोजी अधिनियमाच्या, कलम ७ अन्वये आवश्यकतेनुसार त्याच्या स्थानबद्धतेची कारणे त्याला देण्यात आली होती. २२

फेब्रुवारी १९५१ पासून प्रतिबंधात्मक स्थानबद्धता (सुधारणा) अधिनियम, १९५१ द्वारे अधिनियमात सुधारणा करण्यात आल्यानंतर, १७ मे १९५१ रोजी ७८५३ - एडीएसबी हा नवीन आदेश खालील अटींमध्ये जारी करण्यात आलाः

"पंजाबचे राज्यपाल, अमृतसर जिल्ह्यातील चक सिकंदर गावातील, पोलीस स्टेशन रामदास येथील नरंजन सिंग नथवन वल्द लेह्ना सिंग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीला, राज्याच्या सुरक्षेसाठी पूर्वग्रहदूषित अशा पद्धतीने वागण्यापासून रोखण्याच्या दृष्टीने समाधान झाल्याने, पुढील आदेश देणे आवश्यक आहे:

त्यामुळे आता, प्रतिबंधात्मक स्थानबद्धता अधिनियम, १९५० च्या कलम ३ च्या उपकलम (१) आणि कलम ४ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, जे प्रतिबंधात्मक स्थानबद्धता (सुधारणा) अधिनियम, १९५१ द्वारे सुधारित केले गेले त्याद्वारे पंजाबचे राज्यपाल निर्देश देतात की, हे नरंजन सिंग नथवन पंजाबच्या कारागृह महानिरीक्षकांच्या कोठडीत स्थानबद्ध राहातील आणि ३१ मार्च १९५२ पर्यंत राज्याच्या कोणत्याही तुरुंगात बंदिस्त राहातील, जे सामान्य आदेशाद्वारे किंवा पंजाब स्थानबद्ध नियम, १९५० मध्ये नमूद केल्याप्रमाणे किंवा शिस्तभंगाच्या उल्लंघनासाठी देखभाल, शिस्त आणि शिक्षेच्या अटींच्या अधीन असतील."

सदर आदेश याचिकाकर्त्याला २३ मे १९५१ रोजी देण्यात आला, परंतु या आदेशाच्या समर्थनार्थ त्याला कोणतेही कारण देण्यात आले नाही.

त्यानंतर याचिकाकर्त्याने त्याच्या सुटकेकरिता सदर याचिका दाखल केली आणि असा युक्तिवाद केला की उपरोक्त आदेश बेकायदेशीर होता कारण (१) १० जुलै १९५० रोजी त्याला कळवण्यात आलेली स्थानबद्धतेची कारणे "अगदी अस्पष्ट,जसे [१९५२] एस.सी. आर. ३६८ मध्ये प्रकाशित  खोटी आणि काल्पनिक" होती आणि

(२) १७ मे १९५१ चा आदेश ज्या कारणांवर आधारित होता ती कारणे त्याला देण्यात आली नव्हती. सदर याचिकेवर १२ नोव्हेंबर १९५१ रोजी एकतर्फा सुनावणी झाली, त्यामध्ये या न्यायालयाने सदर याचिकाकर्त्याला का सोडले जाऊ नये याचे कारण दर्शविण्यासाठी उत्तरवादीला आवाहन करणारा तूर्तातूर न्यायादेश जारी केला आणि सदर याचिका २३ नोव्हेंबर १९५१ रोजी अंतिम सुनावणीसाठी ठेवण्यात आली. दरम्यान, राज्य सरकारने १८ नोव्हेंबर १९५१ रोजी एक आदेश जारी केला. १७ मे १९५१ रोजीचा स्थानबद्धतेचा आदेश रद्द केला आणि त्याच दिवशी अमृतसरच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी सुधारित अधिनियमाच्या कलम ३ आणि ४ अंतर्गत याचिकाकर्त्याच्या स्थानबद्धतेसाठी आणखी एक आदेश जारी केला; हा शेवटचा आदेश ज्या कारणांवर आधारित होता तो याचिकाकर्त्याला १९ नोव्हेंबर १९५१ रोजी देण्यात आला.

त्यानंतर याचिकाकर्त्याने २८ नोव्हेंबर १९५१ रोजी सदर न्यायालयासमक्ष एक पुरवणी याचिका दाखल केली, ज्यात शेवटच्या आदेशाच्या वैधतेस आव्हान केले गेले की, "याचिकाकर्त्याच्या देहोपस्थिती (हेबियस कॉर्पस) याचिकेला विरोध करण्यासाठी हे केवळ एक साधन होते ज्यामध्ये एक न्यादेश आधीच जारी करण्यात आला होता" आणि त्याने दिनांक १७ मे १९५१ रोजी पूर्वीच्या आदेशाच्या वैधतेच्या विरोधात अतिरिक्त कारण, म्हणजे सुधारित अधिनियमाच्या कलम ११ द्वारे आवश्यक असलेल्या सल्लागार मंडळाचे मत घेण्यापूर्वी त्याने स्थानबद्धतेची मुदत ३१ मार्च १९५२ पर्यंत निश्चित केली. हे कारण स्पष्टपणे या न्यायालयाने व्यक्त केलेल्या दृष्टिकोनावर आधारित होते की सल्लागार मंडळाचे मत घेण्यापूर्वी सुधारित अधनियमाच्या कलम ३ अंतर्गत स्थानबद्धतेच्या प्रारंभिक आदेशात स्थानबद्धतेच्या कालावधीचे विनिर्देश हे आदेश बेकायदेशीर ठरवतात.

उत्तरवादिच्या वतीने न्यादेशाच्या उत्तरार्थ कारण दर्शविणारे उत्तर दाखल केल्याप्रमाणे, अवर सचिव (गृह) यांनी दिनांक १८ नोव्हेंबर १९५१ रोजी स्थानबद्धतेचा

नवीन आदेश जारी करण्यास कारणीभूत असलेल्या परिस्थितीचे स्पष्टीकरण दिले. सुधारित अधिनियमाच्या कलम ८ अंतर्गत स्थापन केलेल्या सल्लागार मंडळाकडे याचिकाकर्त्याचे प्रकरण पाठवण्यात आले आणि त्यावर विचार करण्यात आला आणि मंडळाने दिनांक ३० मे १९५१ रोजी अहवाल देऊन असे नमूद केले की याचिकाकर्त्याच्या स्थानबद्धतेसाठी पुरेसे कारणं आहेत, प्रतिज्ञापत्र खालीलप्रमाणे आहे:

"सरकारला असा सल्ला देण्यात आला होता की प्रतिबंधात्मक स्थानबद्धता अधिनियम १९५० च्या कलम ११ अंतर्गत प्रतिबंधात्मक स्थानबद्धता (सुधारणा) अधिनियम १९५१ द्वारे सुधारित केलेले आदेश, परंतु उक्त अधिनियमाच्या कलम ३ अंतर्गत आदेशांच्या स्वरूपात अंमलात आणले गेले, त्याचे स्थानबद्धतेच्या कारणास्तव अनुसरण केले पाहिजे आणि त्यानंतर स्थानबद्धतेची कारणे देण्यात यावी आणि बहुतेक प्रकरणांमध्ये असे केले गेले नसल्यामुळे, स्थानबद्धतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाण्याची शक्यता होती. सरकारला आणखी सल्ला देण्यात आला की इतर तांत्रिक दोष आहेत ज्यामुळे विविध स्थानबंधीस्थांना स्थानबद्ध करणे असजसे [१९५२] एस.सी. आर. ३६८ मध्ये प्रकाशित मर्थनीय होऊ शकते. हे लक्षात घेऊन सरकारने असा निर्णय घेतला की सर्व स्थानबंधीस्थांच्या प्रकरणांचा संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी आढावा घ्यावा. त्यानुसार, पंजाब सरकारने जिल्हा दंडाधिकाऱ्यांना प्रकरणांचा आढावा घेण्याचे आणि त्यांच्या बुद्धीचा वापर करून नव्याने लागू करण्याचे निर्देश दिले आणि एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्याचे समर्थन करण्यासाठी स्थानबद्ध करणाऱ्या प्राधिकरणाकडे तर्कसंगत कारणे असणे आवश्यक आहे, यावर भर दिला आणि संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांना स्थानबंधीस्थाला स्थानबद्ध करायचे असेल तर त्यांना प्रत्येक प्रकरणात स्पष्टपणे अहवाल देण्यास सांगितले गेले. पंजाब सरकारनेही काही प्रकरणांचा आढावा घेतला. त्यानुसार याचिकाकर्त्याच्या प्रकरणासह सर्व प्रकरणांचा आढावा घेण्यात आला आणि या प्रकरणात जिल्हा दंडाधिकाऱ्यांचे

पुन्हा समाधान झाले की, राज्याच्या सुरक्षेसाठी आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी पूर्वग्रहदूषित पद्धतीने वागण्यापासून त्याला रोखण्यासाठी स्थानबद्ध करणे आवश्यक आहे आणि"याचिकाकर्त्याला आता अमृतसरच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ताब्यात घेण्यात आले आहे" असे सांगून त्यांनी निष्कर्ष काढला.

मूळ आणि पुरवणी याचिका दिनांक १७ डिसेंबर १९५१ रोजी न्यायमूर्ति फझल अली आणि न्यायमूर्ति व्हिव्हियन बोस यांच्यासमक्ष सुनावणीसाठी योग्य वेळी आल्या, जेव्हा याचिकाकर्त्याच्या वतीने याचिका क्रमांक ३३४/ १९५१ (नरंजन सिंग - विरुद्ध - पंजाब राज्य) मधील या न्यायालयाच्या न नोंदवलेल्या निर्णयातील काही निरीक्षणांवर भर देण्यात आला आणि असा दावा करण्यात आला की सदर निरीक्षणे आणि संविधानाच्या भाग III च्या तरतुदी लक्षात घेता, बसंत चंद्र घोष - विरुद्ध - किंग एम्परर[1] मधील निर्णय, ज्यावर उत्तरवादि अवलंबून होता तो चांगला अधिनियम नव्हता. विद्यमान न्यायाधीशांनी असा विचार केला की सदर प्रकरण घटनापीठाने विचारात घेतले पाहिजे आणि त्यानुसार सदर प्रकरण आमच्यासमोर ठेवण्यात आले. उत्तरवादीच्या वतीने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावरून असे निदर्शनास आले की याचिकाकर्त्याचे प्रकरण १७ मे १९५१ च्या स्थानबद्धतेच्या आदेशाविरूद्ध त्याच्या निवेदनासह, सल्लागार मंडळासमोर त्याच्या विचारार्थ ठेवण्यात आले होते आणि सदर मंडळाने ३० मे १९५१ रोजी अहवाल दिला की त्यांच्या मते याचिकाकर्त्याच्या स्थानबद्धतेसाठी पुरेसे कारण होते. असे म्हणण्यात येते की, त्या अहवालाच्या आधारे, सरकारने निर्णय घेतला की याचिकाकर्त्याला दिनांक ३१ मार्च १९५२ पर्यंत स्थानबद्ध केले पाहिजे, परंतु कलम ११ अंतर्गत योग्य प्रकारे तयार केलेल्या आदेशाने स्थानबद्धतेच्या आदेशाला 'पुष्टी' दिली पाहिजे आणि विशिष्ट कालावधीसाठी स्थानबद्धता 'चालू' ठेवली पाहिजे, तर दिनांक १७ मे १९५१ चा आदेश, सुधारित

1 [१९४५] एफ.सी. आर. ८१

कायद्याच्या कलम ३ अंतर्गत प्रारंभिक आदेशाच्या स्वरूपात गैरसमजाखाली याचिकाकर्त्याला कोणतीही नवीन माहिती न देता त्याच कारणास्तव जारी करण्यात आला. तांत्रिक आणि औपचारिक स्वरूपाच्या संभाव्य दोषांवर आधारित युक्तिवाद टाळण्यासाठी, कलम १३ अन्वये हा आदेश रद्द करण्यात आला आणि जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी या प्रकरणाचा आढावा घेतल्यानंतर, दिनांक १८ नोव्हेंबर १९५१ रोजी कलम ३ अन्वये स्थानबद्धतेचा नवीन आदेश जारी करण्यात आला आणि त्यानंतर याचिकाकर्त्याला संपूर्ण काळ स्थानबद्धकेल्यामुळे, कोणतेही नवीन कारण असू शकत नसल्याने पूर्वीप्रमाणेच त्याच कारणांची औपचारिक माहिती देण्यात आली.

पंजाबच्या महाधिवक्त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की [१९४५] एफ. सी. आर. ८१ मध्ये प्रसिद्ध न्यायनिर्णय हा उपरोक्त आदेशाच्या वैधतेच्या समर्थनार्थ स्पष्ट अधिकार आहे. मूलतः समान तथ्यांवर न्यायालयाने दोन प्रस्ताव मांडले, जे दोन्ही येथे लागू आहेत. (१) पूर्वीचा स्थानबद्धतेचा आदेश केवळ औपचारिक कारणांमुळे सदोष असेल, तर आधीपासून अस्तित्वात असलेल्या कारणांवर आधारित स्थानबद्धतेचा योग्य आदेश घेण्यास अडथळा आणणारे काहीही नाही, विशेषतः अशा प्रकरणांमध्ये कारणांची पर्याप्तता न्यायालये तपासू शकत नाहीत. आणि (२) जर कोणत्याही वेळी न्यायालयासमोर स्थानबद्धतेत असलेल्या व्यक्तीच्या सुटकेचे निर्देश दिले गेले, तर त्याला स्थानबद्धतेत ठेवण्याचे निर्देश देणारा वैध आदेश सादर केला गेला, तर न्यायालय केवळ पूर्वीच्या काही टप्प्यावर स्थानबद्धतेत ठेवण्याचे कोणतेही वैध कारण नव्हते या कारणावरून त्याच्या सुटकेचे निर्देश देऊ शकत नाही. प्रश्न हा नाही की नंतरचा आदेश पूर्वनियोजित स्थानबद्धतेला मान्यता देतो की नाही, तर नंतरच्या वैध आदेशाच्या पार्श्वभूमीवर न्यायालय याचिकाकर्त्याच्या सुटकेचे निर्देश देऊ शकते का ? विद्यमान न्यायाधीशांनी असे निदर्शनास आणून दिले की दिवाणी स्वरूपाची कार्यवाहीमध्ये जसे पक्षकारांच्या अधिकाराची सामान्यतः निश्चिती दावा दाखल करण्याच्या दिनांकावरून ठरवली जाते, तो नियम देहोपास्थीच्या (हेबियस कॉर्पस)

स्वरूपातील कार्यवाहीला लागू होत नाही, परंतु सदर परिस्थितीमध्ये न्यायालय केवळ एकाच प्रश्नाशी संबंधित असतो आणि तो म्हणजे अर्जदारास कायदेशीररित्या स्थानबद्ध करण्यात आले आहे की नाही.

याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलाने हे अनुमान्य केले की तो दुसऱ्या विधानाच्या अचूकतेला आव्हान देऊ शकत नाही, परंतु भारतीय संविधान लागू झाल्यानंतर पहिला प्रस्ताव टिकण्यासारखा नाही या अपवादास आव्हान दिल्या जाऊ शकते. असे नमूद करण्यात आले आहे की अनुच्छेद २२ मध्ये प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या प्रकरणांमध्ये अवलंबण्यात येणारी कार्यपद्धती सांगितली आहे आणि सदर कार्यपद्धतीचे काटेकोरपाने पालन करण्यात यावे कारण न्यायालयाद्वारे सोडण्याची एकमेव शक्यता तांत्रिक किंवा औपचारिक दोषांच्या आधारावर असणे आवश्यक असून न्यायनिर्णयांची एक मोठी श्रृंखला असे व्यक्त करते की प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या प्रकरणांमध्ये न्यायिक पुनरावलोकनाची व्याप्ती व्यावहारिकदृष्ट्या अधिनियमाच्या आवश्यकतांचे काटेकोर पालन केले गेले आहे की नाही या चौकशीपुरती मर्यादित आहे. हे निःसंशयपणे सत्य आहे आणि या न्यायालयास माखन सिंग तारसिक्का- विरुद्ध - पंजाब राज्य (याचिका क्र. ३०८/१९५१)[1] या अलीकडील प्रकरणात विचार व्यक्त करण्याची संधी मिळाली की "एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्याआधी त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रियेचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे आणि ती प्रभावित व्यक्तीच्या गैरसोयीकडे वळवली जाऊ नये यावर अनेकदा जोर दिला जाऊ शकत नाही". मात्र, हा प्रस्ताव संविधानाच्या स्थापनेपूर्वी प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या प्रकरणांना समान प्रभावाने लागू करण्यात आला आणि या स्थितीबाबत संविधानात काय फरक आहे हे पाहणे कठीण आहे. खरे तर, अधिनियमाच्या कलम १३ च्या स्पष्ट तरतुदींद्वारे ही स्थिती आता अधिक स्पष्ट केली गेली आहे, ज्यामध्ये अशी तरतूद आहे की स्थानबद्धतेचा आदेश कोणत्याही वेळी रद्द

1 जसे [१९५२] एस.सी. आर. ३६८ मध्ये प्रकाशित

केला जाऊ शकतो किंवा बदल केला जाऊ शकतो आणि अशा रद्द किंवा बदल करण्यामुळे त्याच व्यक्ती विरुद्ध कलम ३ अंतर्गत त्याला नव्याने ताब्यात घेण्यास प्रतिबंध केला जाणार नाही. एकदा हे अनुमान्य झाले की देहोपस्थिती (हेबियस कॉर्पस) च्या कार्यवाहीच्या संदर्भात न्यायालयाचा संदर्भ वापस येण्याच्या वेळी फक्त कायदेशीर किंवा अन्यथा स्थानबद्धते बाबत असून कार्यवाही दाखल करण्याच्या दिनांकाच्या संदर्भात नाही, हे ग्राह्य करणे कठीण आहे की असद्भावनेच्या पुराव्या अभावी, स्थानबद्ध करणारे अधिकारी अगोदरच्या आदेशाला अवैध समजून, अधिक्रमित करून दोषमुक्त आणि त्यासंदर्भातील अधिनियमाच्या आवश्यकतांचे योग्यरीत्या पालन करणारा त्याऐवजी नवीन आदेश देऊ शकत नाही .

नरंजन सिंग यांच्या प्रकरणातील निरिक्षणांच्या संदर्भात, आम्हाला ते समजत नाही की कोणत्याही सामान्य सिद्धांताप्रमाणे जर पूर्वीच्या आदेशाच्या वैधतेला आव्हान देणारी याचिका एकदा न्यायालयात दाखल झाल्यानंतर स्थानबद्धतेचा कोणताही नवीन आदेश दिला जाऊ शकत नाही. त्या प्रकरणाच्या तथ्यांवरून विद्यमान न्यायाधीशांनी असा निष्कर्ष काढलेला दिसून येतो की याचिकाकर्त्याला स्थानबद्ध करणे अजूनही आवश्यक आहे असे समाधान झाल्याने नंतरचा आदेश निष्पक्षपणे देण्यात आला नाही परंतु तो "स्वाभाविकपणे प्रस्तुत याचिकेला निष्फळ करण्यासाठी" हे उघड आहे. असद्भावाचा प्रश्न जर उपस्थित केला गेला तर प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीच्या संदर्भात नक्कीच निर्णय घ्यावा लागेल, परंतु एका प्रकरणातील निरीक्षणे इतर प्रकरणांशी व्यवहार करताना पूर्वनिश्चित मानली जाऊ शकत नाहीत.

त्यानुसार हे प्रकरण आम्ही पुढील सुनावणीसाठी पाठवतो. ज्या याचिकेमध्ये हाच प्रश्न उपस्थित करण्यात आला असेल त्या इतर याचिकांवर सदर आदेश नियंत्रण ठेवेल.

याचिका परत पाठवल्या.

उत्तरवादीसाठी प्रतिनिधीः पी. ए. मेहता.

## अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."